ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - IV OCTOBER - DECEMBER - 2020

MARATHI PART - II / III

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

5.6

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | नाविन्यपूर्ण आध्यात्मिक भूमिका<br>**प्रा. डॉ. स्मिता शेंडे** | १-६ |
| २ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरणे व सद्य:स्थिती<br>**प्रा. डॉ. विनायक खिल्लारे** | ७-९ |
| ३ | राजर्षी शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>**डॉ. संजय कांबळे** | १०-१३ |
| ४ | राजर्षी शाहू महाराजांचे कल्याणकारी धोरण आणि सद्य:स्थिती<br>**डॉ. रमेश वाघमारे** | १४-१६ |
| ५ | अस्पृश्यांचे उद्धारकर्ते : राजर्षी शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.** | १७-२० |
| ६ | राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक सुधारणा आणि वर्तमान काळातील प्रस्तुतता<br>**प्रा. डॉ. नामानंद गौतम साठे** | २१-२३ |
| ७ | राजर्षी शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरण विषयी धोरणे आणि सद्यस्थिती<br>**प्रेमकुमार कौशल्य** | २४-२६ |
| ८ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरणे व सद्यस्थिती<br>**डॉ. शशिकांत गोकूळ साबळे** | २७-३१ |
| ९ | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**कु. रूपाली एस. कणसे** | ३२-३६ |
| १० | राजश्री शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार<br>**प्रा. पुरुषोत्तम रा. बांडे** | ३७-४१ |
| ११ | राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासकीय विचार<br>**प्रा. डॉ. केशव दत्तराव तिडके** | ४२-४५ |
| १२ | राजर्षी शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी धोरणाची वर्तमानकालीन प्रासंगिकता<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराम** | ४६-५० |
| १३ | राजर्षी शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणाविषयीचे धोरणे आणि सद्यस्थिती<br>**जयवंत पिराजी जुकरे** | ५१-५५ |




Scanned by CamScanner

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ५. अस्पृश्यांचे उद्धारकर्ते : राजर्षी शाहू महाराज

**प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.**
इतिहास विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब.

**प्रस्तावना**

भारताच्या प्राचीन काळापासूनच राजकीय व सामाजिक इतिहासाला ज्या काही महापुरूषांनी आपल्या स्वकर्तृत्वाने व नेतृत्वाने नवी दिशा दिली त्या महान व स्वकर्तृत्वाने नेतृत्वामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून अनेक वर्षे सामाजिक व धार्मिक गुलामगीरीत खितपत पडलेल्या समाजाला एक नवी दिशा दिली होती. त्याचप्रमाणे सबंध भारत इंग्रजांची गुलामीची राजवट भोगत असतांना शाहु महाराजांनी आपल्या कार्यकाळात समाजात एक नव विचाराचे चैतन्य फुंकण्याचे काम केले होते. छत्रपती शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक लोक-उपयोगी कामे करून भारताच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. कृषी, प्रशासन, धरण निर्मिती, मल्लविद्या, गुळ निर्मिती, शिक्षण यांसारख्या अनेक क्षेत्रामध्ये तत्कालीन काळात काम करून आजच्याही राज्यकर्त्यांपुढे एक आदर्श निर्माण करण्याचे काम शाहु महाराजांनी केले आहे. आरक्षणाची निर्मिती करून आधुनिक भारताला एक नवी दिशा देण्यातही शाहु महाराजांचे मोठे स्थान आहे. अशा या अनेक पैलुंनी भरलेल्या आपल्या कार्यांनी इतिहासाच्या पानात अजरामर ठरलेल्या शाहु महाराजांच्या अनेक कार्यापैकी अस्पृश्यासाठी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोध निबंधातुन घेण्यात आला आहे.

**अस्पृश्यांचे उद्धारकर्ते : राजर्षी शाहु महाराज**

राजर्षी शाहु महाराज हे अष्टपैलु व्यक्ती महत्त्व होते. त्यांनी आपल्या काळात अस्पृश्यांच्या, दिनदलितांच्या उद्धारासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले होते. तत्कालीन काळात प्रचलीत असलेली लोकांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यतेचे उच्चाटन होण्यासाठी अनेक उपाय सुचविले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वतःपासूनच ही प्रक्रिया सुरू केली होती. त्यांनी स्वतःच्या खाजगी सेवेत अशा अस्पृश्य लोकांना सामावून घेतले. माहुत, कोचमन, टपालवाला, घोडेस्वार, मोटारींचे ड्रायव्हर, क्लिनर, पोलीस अशा विविध प्रकारच्या लोकांना सुरूवातीस नोकऱ्या दिल्या. तसेच सरकारी कचेऱ्या, दवाखाने, शाळा, सरकारच्या मदतीवर चालणाऱ्या शाळा, पाणवठे, इ. ठिकाणांवर अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला होता. या ठिकाणी कोणी अस्पृश्यांची अडवणूक केल्यास अत्यंत कठोर शासन दिले जाणार असल्याचे फर्मानही त्यांनी काढले. न्यायदान व्यवस्थेत देखील अल्पशिक्षीत अस्पृश्य असल्यास त्याला वकिलीच्या सनदा देण्यात येऊ लागल्या.[1] अस्पृश्यता निवारण्यासाठी 6 सप्टेंबर 1919 रोजी अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा काढला. त्यात 'सर्व सार्वजनिक इमारती,

Scanned by CamScanner

धर्मशाळा, रेस्ट हाऊस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पात्रे, सार्वजनिक विहीरी येथे कोत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानायचा नाही' असे नमूद करण्यात आले. शाहु महाराज हे फक्त जाहिरनाम्यात सांगुन थांबले नाही तर त्यांनी प्रत्यक्ष करूनही दाखविले. त्यावेळी सोनतळी कॅम्प (रजपुतवाडी) म्हणजे असे सामाजिक प्रयोग करण्याची अभिनव प्रयोगशाळा होती. या कॅम्पमध्ये आपल्या सेवेत अस्पृश्यांना घेऊन सर्व समाजासमोर त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्याचा वस्तुपाठच ठेवला होता. छत्रपती शाहु महाराजांचे बिनातारखेचे एक आत्मनिवेदन उपलब्ध झाले आहे. त्यात या प्रयोगशाळेविषयी खुद्द त्यांनीच म्हटले आहे 'रजपुतवाडीस मरगाई (आदी) अडतीस देव देवी, सर्व पीर व गजेंद्र लक्ष्मी या सर्वांच्या पुजा गणु नावाचा अपृश्य करीत असतो.त्या देवास कॅम्पातील सर्व लोक खुद्द महाराजही जातात. तेथील पाण्याच्या हौदावर सर्वांना शिवाशिव करणेही मोकळीक आहे'.[2] एकंदरीत या कॅम्पात मजा अशी आहे की कॅम्पातील सर्व मंडळी एकत्रीत बंधु प्रेमाने राहतात.

दिनदलित अस्पृश्यांचा उद्धार करावयाचा झाल्यास शिक्षणाशिवाय मार्ग नाही हे ओळखून छत्रपती शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली होती. त्यांच्या शिक्षणासाठी एक खास शिक्षण संस्था 1908 मध्ये काढली गेली. 1901 ते 1922 या एकूण बावीस वर्षीय काळात त्यांनी अनेक शाळा काढून त्यांच्या जोडीला तेवीस वसतीगृहे निर्माण करून त्या-त्या जातीच्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शिक्षणाची सोय केली गेली. एवढेच नव्हे तर राजर्षी शाहु महाराजांनी 1919 मध्ये अस्पृश्य मुला-मुलींना संपूर्ण फी माफ केली. दलितांच्या मुलांसाठी 1908 मध्ये एकच वसतिगृह होते. पुढे त्यात वाढ करून सात वसतिगृहाच्या निर्मिती करण्यात आली.[3] या वसतीगृहातून मुलांना राहण्याची सोय करण्यात आली होती. याचे कारण त्या काळी शिक्षणाच्या ठिकाणी राहण्याची सोय उपलब्ध होत नसे. फक्त वसतीगृहाची निर्मिती करूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी 1 जानेवारी 1919 रोजी जे ढोर-चांभार या अस्पृश्य लोकांसाठी जी बोर्डींगची स्थापना केली होती त्यामध्ये जेंव्हा हे अस्पृश्य देखील आपआपसात अस्पृश्यता पाळत आहेत हे पाहुन त्यांनी ढोर आणि चांभार या दोन समाजासाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू केले. एवढेच नव्हे तर त्यांनी या वसतिगृहासाठी बिंदु चौकात असलेली एक इमारत देऊन एक हजार रूपये देणगी दिली व या बोर्डींगच्या खर्चासाठी दर सालास 225 रूपयांचे अनुदानही मंजुर केले.[4]

छत्रपती शाहु महाराज अस्पृश्य लोकांच्या शिक्षणाची व शिक्षणासाठी राहण्याची सोय करून थांबले नाहीत तर त्यांनी शिक्षण घेऊन तयार झालेल्या लोकांच्या उदर्निवाहाचीही सोय केली. या बद्दल महाराजांचे मत होते की, 'मागासलेल्या जातीतील उच्चशिक्षण घेतलेल्या व्यक्तींना संस्थानातील नोकऱ्यांच्या रूपाने त्यांच्या शिक्षणाचे पारितोषिके विस्तृत रितीने विभागुन दिले नाही तर त्यांच्या जातीला उच्च शिक्षण घेण्याची आकांक्षा व उमेद पैदा होणार नाही. त्यासाठी शिक्षणाची सोय तर करायलाच हवी पण शिकुन तयार झाल्यावर त्यांना सामाजिक समतेच्या सामाजिक न्यायाच्या तत्वानुसार योग्य संधीही उपलब्ध करून द्यायला हवी. प्रशासनातील अधिकार हा एक परीने राजसत्तेच्या उपभोगातील



Scanned by CamScanner

वाटणीच असते.[5] हे जाणुन त्यांनी एक क्रांतीकारी पाऊल उचलले. मागासलेल्या वर्गातील लोकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवल्या. या वेळी काही वर्गाने त्यांच्या निर्णयाविरोधात काहुर माजविले. पण महाराजांनी त्यांची अजिबात पर्वा केली नाही.बहुजन समाजासाठी कार्य करीत असताना कितीही अडचणी, अडथळे आले तरी त्यांनी धैर्याने तोंड दिले. या संदर्भात महाराज म्हणाले होते, 'राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर, पण मागासलेल्या आणि अविकसित समाजाच्या सेवेचे वृत मी सोडणार नाही'.[6] छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी दलित व गरीब समाजातील होतकरू लोकांना नोकऱ्या व शिक्षण देऊन त्याचा उद्धार केला. आरक्षणाची सुरूवात त्यांनीच सर्वप्रथम केली. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी आपल्या संस्थानात आरक्षण लागु करून अस्पृश्य समाजाच्या उद्धाराचा मार्ग मोकळा केला.

छत्रपती शाहु महाराजांनी शिक्षण, आरक्षण यांच्याबरोबर अस्पृश्य उद्धारासाठी प्रचलीत असणाऱ्या अनेक सामाजिक रूढी, प्रथा परंपरांनाही छेद दिला होता. अस्पृश्य समाजाला टीचभर जमीनीच्या अमिशाने महार कुटूंबाला पिढ्यान्‌पिढ्या वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीत अडकविलेल्या महार वतनाची क्रुर पद्धत 18 सप्टेंबर 1918 रोजी महाराजांनी कायद्याने नष्ट केली. मांग, कारूडी यांच्या सारख्या अनेक गुन्हेगार समाजल्या जाणाऱ्या जातींना दररोज रात्री कोणत्याही परिस्थितीत चावडीवर हजेरी द्यावी लागे तीही पद्धत 31 ऑगस्ट 1918 रोजी महाराजांनी बंद केली. अस्पृश्यांनी आपला उल्लेख अस्पृश्य या शब्दाने न करता त्यांनी सुर्यवंशी म्हणून उल्लेख करावा असा 1917 मध्ये राजपत्रात उल्लेख करून त्यांच्या मनातील न्युनगंड दुर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.[7] या अशा अनेक क्रांतीकारक अस्पृश्य उद्धारक निर्णय बरोबरच त्यांनी अस्पृश्य उद्धारासाठी अनेक कार्य केली. एवढेच नव्हे तर दलित समाजाविषयी व चळवळी विषयी केवळ भूतदयावादी आस्था न दाखविता ते अनेक चळवळीत प्रत्यक्ष सहभागी झाले होते. 15 एप्रिल 1920 ला माणगाव येथे संपन्न झालेल्या अस्पृश्यता निर्मुलन परिषदेत शाहु महाराजांनी हजर राहुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते हे त्यांनीच शोधुन दिल व त्यांचे नेतृत्व अस्पृश्य दलित समाजाने स्वीकारण्याचे आवाहन केले.[8] अशा प्रकारे अस्पृश्य उद्धारक म्हणुन पुढे येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे नेतृत्व शाहु महाराजांनी अस्पृश्य समाजल्या जाणाऱ्या लोकांना दिले.

**सारांश**

छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या कार्यकाळात अनेक नाविण्यपूर्ण कामे करून इतिहासात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्याच बरोबर अनेक वर्षेपासून खितपत पडलेल्या दिनदलित अस्पृश्य समाजल्या जाणाऱ्या लोकांच्या उद्धारासाठी शाहु महाराजांनी अत्यंत कठिण अशा तत्कालिन परिस्थितीत शिक्षण, वसतीगृहे, आरक्षण यांसह अनेक नवनवीन नियम बनवून या समाजच्या उद्धाराचे कार्य केले. एवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अस्पृश्य उद्धारक ठरणाऱ्या व्यक्तीला सहकार्य, मदत करून अस्पृश्यांची भविष्यकालीन वाटचाल देखील सुखकर व्हावी याची तजवीज करण्याचे काम छत्रपती शाहु महाराजांनी केले असे म्हटले तर वावगे ठरू नये.



Scanned by CamScanner

**संदर्भसूची**

1. प्रा. नानासाहेब साळुंखे : 'शाहुंच्या आठवणी', वृषाली प्रकाशन कोल्हापुर, पृ.क्र. 10.
2. डॉ. आर. एस. कोंडेकर : 'रयतेचा राजा : राजर्षी शाहु महाराज', अरूणा प्रकाशन, लातुर, पृ.क्र. 145.
3. संपा. डॉ. अशोक नाईकवाडे : 'राजर्षी छत्रपती शाहु महाराज', विद्याभारती प्रकाशन, लातुर, पृ.क्र. 132.
4. प्राचार्य रा. तु. भगत : 'राजर्षी शाहु छत्रपती जीवन व शिक्षण कार्य', रिया पब्लिकेशन्स, कोल्हापुर, पृ.क्र. 278.
5. संपा. डॉ. नारायण कांबळे : 'राजर्षी शाहु : नव्या दिशा नवे चिंतन', चिन्मय प्रकाशन, औरंगबाद, पृ.क्र. 415.
6. अरूण नवले : 'भारतीय क्रांतीकारक आणि समाज सुधारक', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. 175.
7. उपरोक्त, प्रा. नानासाहेब साळुंखे, पृ.क्र. 10.
8. उपरोक्त, संपा. डॉ. अशोक नाईकवाडे, पृ.क्र. 132.

Scanned by CamScanner